ISSN 2231-5063 Impact Factor : 4.6052 (UIF) Volume - 6 | Issue - 3 | September - 2016

Golden Research Thoughts

महामानवांचे शैक्षणिक विचार आणि आजचे वास्तव : एक शोध

प्रा.डॉ.राजकुमार मस्के
मराठी विभागप्रमुख , महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय,उदगीर.

प्रस्तावना:-

जीवनाला सुयोग्य आकार येण्यासाठी शिक्षण हाच एकमेकाद्वितीय पर्याय आहे. शिक्षणाने माणसाला शहाणपण येते. शिक्षण म्हणजे संस्कार. शिक्षण म्हणजे विवेक, शिक्षण म्हणजे शील, करुणा ! शिक्षणानेच माणसाला दूरवरचे कळते. प्रतिकार कशाचा आणि कसा करावा? अन्याय म्हणजे काय? न्याय म्हणजे काय? स्वातंत्र्य, समता आणि बंधुभावाचे अर्थ कोणते? शत्रू आणि मित्र कुणाला म्हणावे? त्याग कशासाठी करावा? सामाजिक बांधिलकीचे भान ठेवावे की नाही? ज्ञान हा माणसाचा तिसरा डोळा आहे, म्हणजे नेमकं काय? पालक, प्राध्यापक, विद्यार्थी यांची आपल्या पाल्यांच्या शिक्षणाबाबत कोणती भूमिका राहावी? महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना शिक्षणातून कोणता समाज निर्माण व्हावा असे वाटत होते? प्लेटो या ग्रीक तत्त्वज्ञाने शिक्षणाला कशासाठी महत्त्व दिले? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे केवळ शिक्षणामुळेच मिळू शकतात. प्राथमिक, माध्यमिक उच्च शिक्षणाचे आजचे स्वरूप नेमके कशाप्रकारचे आहे? शिक्षणतज्ज्ञ, पालक, अध्यापक व विद्यार्थी यांचा ह्याबाबतीत दृष्टिकोन कोणता आहे, याचा विचार प्रस्तुत लेखात अभिप्रेत आहे.

महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे शिक्षणासंदर्भात अतुलनीय योगदान आहे. शूद्रातिशूद्रांच्या गुलामगिरीचे कारण अज्ञान हेच आहे, याची जाणीव त्यांना झाल्यानंतर एक व्रत म्हणूनच त्यांनी शैक्षणिक व सामाजिक कार्याला



स्वत:ला वाहून घेतले. 'विद्येविना मती गेली। मतिविना नीती गेली। नीतिविना गती गेली। गतिविना वित्त गेले। वित्तविना शूद्र खचले। इतके अर्थ एका अविद्येने केले।।' असे ठामपणे म्हणून त्यासाठी रात्रंदिवस अपार कष्ट केले. मानापमानाची फिकीर न करता अज्ञानाच्या तमाला जाळण्याची त्यांनी शपथ घेतली आणि कृतीही केली. महात्मा फुले यांना शिक्षणातून कर्ते सुधारक निर्माण व्हावेत असे वाटत होते. 'शिक्षणाचा झिरपता सिद्धांत' ही लबाडी होती, हे महात्मा फुले यांनी ओळखल्यामुळेच या सिद्धांताला नकार दिला. ब्रिटिशांच्या शैक्षणिक धोरणाला महात्मा फुले यांनी विरोध करण्याचे कारण म्हणजे इंग्रजांचे शिक्षणविषयक धोरण ब्राह्मणाला फायदेशीर होते. ब्राह्मण शिक्षण घेतल्याच्यानंतर शूद्रांना फसविण्याचे सोडून देतील, हा इंग्रजांचा हेतू सदोष होता. ब्राह्मण आपल्याला मिळालेल्या ज्ञानाचा फायदा स्वत:लाच करून घेतील. शूद्रातिशूद्रांचे शोषण करण्यासाठीच ब्राह्मण ज्ञानाचा उपयोग करतील. महात्मा फुले द्रष्टे होते. पदवीबरोबरच शिक्षणातून कुशल व्यक्ती निर्माण व्हावा, व्यवसाय करण्यास लायक नागरिक शिक्षणातून तयार व्हावा, असे त्यांना वाटत होते. प्राथमिक शिक्षणाच्या अनिवार्यतेविषयी त्यांची भूमिका काल, आज आणि उद्यासाठी समाज व राष्ट्राला फायद्याची ठरणारी आहे. महात्मा फुले यांच्या शिक्षणाची अडचणी व अडथळे यांच्यावरील उपाय आजही प्रेरक आहेत.

आजच शिक्षणात ब्राह्मणांबरोबरच बहुजनही आघाडीवर आहे. शिक्षित व नोकरीवर असलेला बहुजन ब्राह्मणांपेक्षा कितीतरी पटीने अधिक स्वान्तसुखाय झालेले आहेत. बहुजनांचे मारेकरी (व्यापक अर्थाने) बहुजनच दिसून येत आहेत. सत्ता, शिक्षण, अर्थकारण; अशा अनेकविध क्षेत्रात बहुजनांची माणसं अधिकार पदावर कार्यरत असतांना बहुजनातील तळाच्या माणसाचे शोषण का होते?

सत्तेत शेतकऱ्यांची पोरं असताना शेतकरी आत्महत्या का करतात ? बहुजनांतील बुद्धीवादी, भौतिक सुखाच्या आहारी गेल्यामुळे त्याला सिंहावलोकन करणाची गरजच वाटत नाही. भाषणाला मानासन्मानाने गेलेच तर ब्राह्मणी व्यवस्थेला शिव्या घातल्याशिवाय त्यांना भाषण उत्तम झाल्याचे समाधान वाटत नाही? ब्राह्मणी व्यवस्थेला शिव्या देत स्वतःच त्या व्यवस्थेचे नम्र पाईक होण्याची बहुजनांच्या (अपवाद सोडले तर) जाणऱ्या-नेणत्यांमध्ये स्पर्धा लागली आहे. तोंडात शाहू, फुले वर्तनात मनुची तत्त्वे ही विसंगती बहुजनांसाठी मारक आहे. जात नष्ट करण्याचे शिक्षण, विचार देणारे महामानव आज हरले आहेत; कारण वाणीतले महामानव वर्तनात कुठेच दिसत नाहीत, ही आजची महान शोकांतिका आहे. शिक्षणाचा व्यापार करणाऱ्या बहुजनांच्या थोर शिक्षण सम्राटांनी शिक्षण हे सम्यक परिवर्तनासाठी नसून स्वतःच्या व कुटुंब आणि नात्यागोत्यांच्या, जमलच तर जातीच्याच उद्धारासाठी आहे, हेच शैक्षणिक संस्थांच्या अभ्यासातून स्पष्ट होते. नावं ठेवू नये किंवा राखीव जागा भरण्याचा दंडक असतो म्हणून काहीजन नाक-डोळे कपाळ लहान करीत अनिच्छेने पात्र मागासवर्गीयांची भरती केली जाते; बाकी संस्थाचालकांच्या जातीचाच भरणा असतो. महामानवांच्या नावांवर जगणाऱ्या, घटनेचे फायदे विश्वतांऐवजी मालक झालेल्या अत्यंत चलाख नेत्यांना शहाणपणा केव्हा येणार? इतके अनर्थ अतिविद्येमुळे झाले असे म्हणण्याइथपर्यंत पातळी खाली गेली आहे.

प्राथमिक व माध्यमिक शिक्षण संख्यात्मकदृष्ट्या खूपच वाढते; पण गुणात्मकदृष्ट्या खूपच वाढले; पण गुणात्मकदृष्ट्या ते खूपच खाली गेलेले दिसून येत आहे. शिक्षण समाजपरिवर्तनासाठी की समाजाच्या शोषणासाठी असा चिंतेचा विषय आज झाला आहे. महाराष्ट्र राज्य पुरोगामी, प्रगत आहे असे आपण समजतो. सुमारे ७२ टक्के विद्यार्थी आठवीपर्यंत जातात. ९२ टक्के विद्यार्थी-विद्यार्थिनी १० वी व १२ नंतरचे शिक्षण घेत नाहीत. आपल्या पुरोगामी, प्रगत महाराष्ट्रात शाळांचे हाल पाहावत नाहीत. गळती प्रचंड, शिक्षित अध्यापकांची कमतरता, संस्थाचालक व त्यांच्या नातेवाईकांची मुजोरी शासकीय कर्मचाऱ्यांची हक्कांबद्दल जागरूकता, कर्तव्याबद्दल? सारा ठणठणपाळच ! दि.६.७.०८ च्या महाराष्ट्र टाइम्सच्या अंकात एम.बी.बी.एस. ला ३५ ते ४० लाख रुपये, बी.डी.एम. ला १२ ते १५ लाख रुपये, एम.डी. / एम.एस. साठी ६० ते ७० लाख रूपये, इंजिनिअरिंग, बी.एड., डी.एड. व नोकरीसाठी मानाने धन देण्याची घेण्याची संस्कृती बहुजनातील नाहीरे वर्गाला नष्ट करणारी आहे. एकीकडे मोठ्या उद्योगपतींचे पगार कोटीत; तर ६६ टक्के बालके कुपोषित आहेत. उपेक्षित घटकांतील १० टक्के मुलं उच्चशिक्षण घेताहेत बाकीच्यांचे काय?

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाच्या संदर्भात म्हटले आहे की, ''शिक्षण हेच सर्व सामाजिक समस्या आणि रोगावरील जालीम औषध आहे.'' शिक्षणाला वाघीणीच्या दुधाची उपमा देणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर कर्ते सुधारक होते. शिक्षणातून वाघ तयार व्हावेत; परंतु वर्तमानात मेंढरांचे काळच जन्मास येत आहेत. प्लेटो यांनीही शिक्षणाचे महत्त्व विशद केले आहे. ऋग्वेदात ''आत्मनिर्भर व निःस्वार्थी बनविणे म्हणजे शिक्षण होय'' असे म्हटले आहे. महात्मा गांधीजी यांनी म्हटले आहे की, ''शिक्षण म्हणजे शरीर, मन आणि हृदय या त्रैयींचा विकास होय.'' प्लेटो असे म्हणतात की, ''सत्यं, शिव व सुंदरम् ही जीवनाची अंतिम मूल्ये समजण्याची व अनुभवण्याची पात्रता व्यक्तीत आणून देणे म्हणजे शिक्षण होय.''

विद्यार्थ्यांमध्ये सर्व गुणांचा विकास व्हावा, त्यांच्यात विविध कौशल्ये यावीत, स्वातंत्र्य, न्याय, बंधुभाव, समता, सहिष्णुता, सविनयता, शिस्त, श्रद्धा इत्यादी मूल्यांची जाणीव करून देणाऱ्या शिक्षणाची गरज आहे. चारित्र्याचा विकास, शिक्षणातूनच वैज्ञानिक दृष्टिकोन येणे, व्यक्तिमत्त्वाचा सर्व बाजूने विकास होणे याला शिक्षण म्हणतात. शिक्षण म्हणजे फसविणे नव्हे, तर हसवित हसवित उच्च ध्येयशिखर गाठण्याची (सन्मार्गाने) प्रेरणा देणे होय. केवळ पोट भरण्याचे ज्ञान देणे म्हणजे शिक्षण नव्हे, तर इतरांशी प्रेमाने, सहानुभूतीने, संयमाने वागण्याचे शिक्षण देणे, हा शिक्षणाचा अर्थ होय. शिक्षणाची केंद्रे ऊर्जाकेंद्रे व्हावीत; धनकेंद्रे होवू नयेत. शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रातील ही मल्टीलुटालूट थांबवली नाही, तर अराजक माजायला वेळ लागणार नाही.

ब्रिटिशांनी १८५७ साली आपल्या देशात मुंबई, मद्रास व कलकत्ता ही विद्यापीठे स्थापन करून उच्चशिक्षणाची सुरूवात भारतात केली. भारतात सर्व विद्यापीठांची संख्या पाही तर ४५० पेक्षाही ही संख्या अधिक निघेल. २०,००० महाविद्यालये आणि १ कोटीच्या पुढे विद्यार्थी-विद्यार्थिनी विविध विद्याशाखांमध्ये शिकत आहेत; अर्थात ह्या संख्येमध्ये वाढ होण्याचीच शक्यता आहे. कृषी आणि अकृषी विद्यापीठांचे, वरिष्ठ महाविद्यालयांचे आजचे वास्तव काय आहे? या शिक्षणावर होणारा खर्च आणि त्याचे फायदे घेणारा वर्ग संवेदनशील विचारवंताला भोवळ आणणारा आहे. विद्यापीठांमधून व महाविद्यालयांमधून होणारे संशोधन आणि त्यासाठीचे अनुदान पाहिले म्हणजे; या संशोधनाचा राष्ट्राला, समाजाला फायदा त्यावरील खर्चाच्या तुलनेत नगण्य आहे. संशोधनाचे 'नोबेल' भारतीयांना हुलकावणी देत आहे, हे नुसतेच गंभीर नाही तर आपल्या देशासाठी अवमानजनक आहे. उच्चशिक्षणात सामाजिक न्यायाला फारसे महत्त्व दिले जात नाही. कुशल मनुष्यबळ तयार होण्यापेक्षा क्रूर मनुष्यबळ तुलनेने अधिक तयार होत आहे, ही दरी समाज व देश-विघातक आहे. पारंपरिक शिक्षणात मोठ्या बदलाची गरज आहे. ज्ञान-विज्ञान व कौशल्यांबरोबर विवेकाचे व सामाजिक न्यायाची दृष्टी देणारे मनुष्यबळ तयार करणे आवश्यक झाले आहे. उच्च दर्जाचे आंतरविद्याशाखी शिक्षण सुरू होणे काळाची गरज आहे; मात्र स्वातंत्र्य, समता, सामाजिक न्याय व बंधुभावाच्या मूल्यांचा विसर पडू देता कामा नये. संशोधक, शिक्षक, विद्यार्थी यांना मोठ्या प्रमाणात सोयी-सुविधा पुरविणे, सवलती दिल्या तर देश व समाजाची प्रगती दूर नाही.

आजचा काळ जागतिकीकरणाचा शिक्षणाला उद्योगाचे आणि विद्यार्थ्यांना वस्तूंचे स्वरूप प्राप्त झाले आहे. सामाजिक सेवांपासून हे क्षेत्र दूर गेले आहे. शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे गरीब-श्रीमंतामधील दरी रूंदावत आहे. विनाअनुदान व 'मॅनेजमेंटचा कोटा' ह्यामुळे गरिबांना

शिक्षणप्रक्रियेतून बाद केले आहे. शासनाने वंचितांच्या कल्याणासाठी खाजगी प्रक्रिया पूर्णतः थांबवून सर्व शिक्षणच आपल्या ताब्यात घेतले पाहिजे, तेव्हा कुठे ह्या पवित्र क्षेत्रातील ठेकेदारी संपेल ! आजच्या शिक्षणातून मुलं-मुली प्रेमळ, प्रज्ञावंत बनण्यापेक्षा पांढरपेशी बनताहेत. विद्यार्थी नवनिर्मितीला उद्युक्त व्हावा, तो उत्तम चिकित्सक बनला पाहिजे, त्याने स्वतंत्रपणे नवा विचार करावा. विद्यार्थ्यांनी विचारी बनावे. आज तो विचारापेक्षा विकारी व विषारी बनत चालला आहे. चिंतन, चिकित्सेपेक्षा चिंता त्यातून नकारात्मक दृष्टी घेवून एक तर हिंसात्मक किंवा जीवनयात्रा संपविण्याच्या मार्गावरून वाटचाल करीत आहे. जिद्द, जिज्ञासा आणि जाज्वल्य निष्ठावंत विद्यार्थी, माती, माता आणि माणसांवर जीवापाड प्रेम करणारा, सहानुभूती ठेवणारा विद्यार्थी आजच्या शिक्षणातून तयार होण्याची गती खूपच मंद आहे. धैर्यशील विद्यार्थी, दृष्टी असलेला विद्यार्थी, चांगली व्यसने असलसेला विद्यार्थी, घारीच्या नजरेचे पालक, ज्ञानपिपासू समर्पित शिक्षक, सेवाव्रती संस्थाचालक केवळ 'अेपीआय' चे वेड असलेलं शैक्षणिक नेतृत्व नको, तर ज्ञानी, गुणी, चारित्र्यसंपन्न, नवे प्रयोग करण्याची ओढ, अपार सहानुभूती व ध्येयवेडं नेतृत्व शिक्षणक्षेत्राला अनिवार्य आहे. देशाला उत्तम, विनम्र, विचारी, विद्रोही आणि वेदना जाणण्यासाठी संवेदना जागविणारे सुशील तरुण आवश्यक आहेत. शिक्षणातून असा तरुण तयार करण्याचे आव्हान माता-पिता, शिक्षक, संस्थाचालक, विद्यार्थी, समाज व सत्ताधाऱ्यांनी स्वीकारने व सचोटीने पूर्ण करणे ह्यातच सर्वांचे हीत आहे. पण ह्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून मी, माझे आणि फक्त मलाच ह्या वृत्तीमध्ये स्वातंत्र्यानंतर कमालीची वाढ झालेली आहे. २० जुलै १९५२ रोजी केलेल्या भाषणात बाबासाहेब म्हणतात, ''तुम्ही हे सामाजिक कार्य करता, त्याबद्दल मला समाधान वाटते. तुमच्या संगमनेर वसतिगृहाच्या इमारत फंडस मी शुभेच्छा प्रकट करतो. पण मला लोकांना एक प्रश्न विचारावासा वाटतो तो हा की, तुम्ही या समाजाच्या मुलांना स्वतः खस्ता खाऊन शिक्षण देता ती मुलं शिक्षण संपादन केल्यानंतर तुमच्या समाजाच्या उन्नतीप्रीत्यर्थ काही करणार आहेत का? तुम्ही त्यांच्याकडून याबाबत काही प्रतिज्ञा लेख लिहून घेता काय? (नाही असे उत्तर मिळाल्यावर) पददलित समाजाची सेवा करण्यासाठी आपल्यातील काही मुलं शिकून तयार व्हावीत म्हणून मी सिद्धार्थ कॉलेज काढले. पण अनुभवमात्र कटू येत आहे. शिक्षण संपादन केल्यानंतर एखादी मोठी नोकरी मिळाली की बस्स ! झाले आपले काम ! मी कोण आहे? मला शिक्षण कोणी दिले? कसे दिले? त्यांनी किती कष्ट केले? याची तिळमात्र जाणीव न ठेवता हे लोक आपल्या समाजाला विसरतात.''[१]

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची शिकलेल्या व्यक्तिंकडून अपेक्षा मोठी होती. शिकलेल्यांनी सामाजिक बांधिलकीचे भान ठेवून सामाजिक ऋण फेडावे ही उदात्त भावना हरवल्याचे वर्तमान काळात दिसून येत आहे. महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी कवे अशा अनेक कृतीशील सुधारकांच्या विचारकार्याचे भांडवल करून 'केजी ते पीजी' पर्यंत शिक्षणाचा बाजार मांडला आहे. काही सन्माननीय अपवाद सोडूनही शिक्षणाची परिस्थिती अत्यंत वाईटच आहे. अनुदान मिळविणे, तुकड्या दाखवून नव्या जागा काढायच्या व शिक्षक, प्राध्यापक व अन्य नोकरदारांकडून धन घ्यावयाचे ! शिकलेल्या माणसांकडे शील, सौजन्य आणि सामाजिक वास्तवाचे भान नसेल, तर हिंस्र पशूसारखेच त्याचे वर्तन असते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ''शिक्षण घेतलेल्या माणसाच्या अंगी शील व सौजन्य नसेल तर तो हिंस्र पशूपेक्षाही क्रूर व भीतीप्रद समजण्यात यावा.''[२]

अज्ञानी, गरजवंतांना फसविण्यात पटाईत असलेले शिक्षणसम्राट अमाप आहेत. शिक्षणक्षेत्रातील ठेकेदारी अंगणवाडीपासून विद्यापीठांपर्यंत रोजरोसपणे चालू आहे. 'खाजगी' हा शब्द सर्वत्र प्रचलित झाला आहे. सरकारी ह्या शब्दाचा आता विसर पडू लागला आहे. भरमसाठ फी, चकचकीत परिसर, खाजगीवाल्यांची मुजोरी, चलाख अधिकारी, धूर्त पदाधिकारी व ध्येयशून्य सत्ताधीश यांनी शिक्षणाचा नवा पॅटर्नच निर्माण केला आहे. जनतेचा बर्फ झाला आहे. पालकांनी प्रज्ञेच्या माळा स्वार्थाच्या खुंटीला टांगल्या आहेत. शिक्षणतज्ज्ञ सत्तेसाठी शांत झाले आहेत. शिक्षकाला बोलू दिले जात नाही. केलेच एखाद्याने धाडस, तर त्याला कामापासून अलिप्तच ठेवले जाते, उपेक्षा केली जाते. वांझ ज्ञानदांडगे, अविवेकी शैक्षणिक नेतृत्व, स्वार्थ आणि संधीसाधू सुधारक, शिक्षणाबद्दलची उदासिनता, सवर्ण व दलित यांच्यातील वाढत चाललेली दरी, उपेक्षित, वंचित व आर्थिकदृष्ट्या दुर्बलांना न पेलणारा शिक्षणाचा खर्च ही शिक्षणातील प्रदूषणे वाढत गेली तर समाज व राष्ट्रच दुभंगायला वेळ लागणार नाही. शिक्षणातून केवळ पोटभरू नागरिक तयार होवू नये, तर प्रज्ञावंत नागरिक तयार व्हावा. भेदाला, भोगाला, भूकेला आणि भीतीला मुक्त करणारे शिक्ष्ज्ञण दिले तरच भारत बलशाली होईल असे वाटते.

शेवटी काही निष्कर्ष नोंदविता येतील. १) शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे विषमता निर्माण झाली आहे. २) विश्वस्त हे मालकच झाले आहेत. ३) कर्मचाऱ्यांच्या शोषणामुळे त्यांच्या कार्यकुशलतेवर परिणाम झाला आहे. ४) शिक्षणक्षेत्रात छुप्या पद्धतीने अस्पृश्यता पाळली जाते. ५) शिक्षणातून विद्यार्थी, पालक व शिक्षकांत संवाद हरवला आहे. ६) शिक्षण, संस्कार आणि कौशल्याचा समतोल बिघडला. ७) गुणवत्ता शिक्षणाचा अभाव ८) शिक्षणातून समताधिष्ठित व शोषणमुक्त समाज निर्माण झाला नाही.

संदर्भ :

१) दलितांचे शिक्षण, भीमराव रामजी आंबेडकर, पृ.२२४
२) तत्रैव